<u>रस्त्यांवरील सुरळीत वाहतुकीसंदर्भात</u>
<u>उपाययोजनांबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः न्यायप्र-०८१८/प्र.क्र.१०५/पोल-८
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
तारीख: २६ मार्च, २०१९

<u>वाचा :</u>

गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: न्यायप्र-०८१८/प्र.क्र.१०५/पोल-८,दिनांक ०९.१०.२०१८

<u>शासन परिपत्रक</u> :

रस्त्यांवर अनधिकृतपणे सोडून दिलेली वाहने / बेवारस वाहने हटविणे तसेच याबाबत नागरीकांना तक्रारी नोंदविण्यासाठी यंत्रणा गठीत करणे याबाबतची करावयाची कार्यपध्दती समक्रमांक दिनांक ९ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यांत आली आहे. वाहतूक सुरळीत रहावी याकरीता उक्त कार्यपध्दतीबरोबरच वैधानिक दंडात्मक तरतुदींचा देखील अवलंब आवश्यक ठरतो. जेणेकरुन, अशा प्रवृत्तींस पायबंद बसेल. सबब, सदर कार्यपध्दतीमध्ये पुढील अतिरिक्त सूचना देण्यांत येत आहे :-

मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम २०१ मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे :-

(१) जो कोणी, कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, कोणतेही वाहन सुरळीत वाहतूकीस अडथळा येईल अशा रीतीने उभे करील त्याला ते वाहन जोपर्यंत त्या स्थितीत राहील तोपर्यंत प्रत्येक तासाला पन्नास रुपयांपर्यंत दंड होऊ शकेल ;

परंतु, अपघात झालेले वाहन कायद्यानुसारच्या तपासणीविषयक औपचारिक बाबी पूर्ण झाल्यानंतरच दंडाकरीता पात्र ठरेल.

(परंतु आणखी असे की, ते वाहन सरकारी एजन्सीने हलवलेले असेल तेव्हा ते ओढून नेण्याचा खर्च मालकाकडून किंवा असे वाहन जिच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीकडून वसूल करण्यांत येईल)

(२) *या कलमाखालील दंड किंवा वाहन ओढून नेण्याचा खर्च, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ज्याला प्राधिकार देईल असा अधिकारी किंवा प्राधिकारी वसूल करील.*

उक्त वैधनिक तरतूद विचारात घेता, या तरतुदीची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी करावी, असे शासन निर्देश देण्यांत येत आहेत.

सध्या राज्यातील अनेक शहरांमध्ये मेट्रो रेल्वेची कामे सुरु आहेत. या कामांमुळे रस्त्यांची रुंदी तात्पुरती कमी होऊन रस्त्यांवरची वाहतूक बाधीत होते. सबब, अशा रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत सुरु रहावी याकरीता तेथे अनधिकृत वाहन पार्किंग होऊ नये व त्या ठिकाणी भंगार / बेवारस वाहने पडून राहू नयेत याकरीता वाहतूक पोलीस आणि मेट्रो प्रकल्प उभारणी करणारे प्राधिकरण / कंपनी यांनी सदर ठिकाणी आवश्यक सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. सदर उपाययोजनांची अंमलबजावणी ही निरंतर व प्रभावीपणे अंमलात राहील याकडे विशेष लक्ष पुरवावे.

वाहतुकीस अडथळा ठरणारी रस्त्यांवरील भंगार/ बेवारस वाहने, अनधिकृत पार्किंग इ. बाबत नागरीकांना तक्रारी करण्यासाठी निर्माण करण्यांत आलेल्या तक्रार निवारण यंत्रणेस मोठया प्रमाणात व वेगवेगळया माध्यमांद्वारे नियमितपणे प्रसिध्दी देण्यांत यावी, जेणेकरुन अधिकाधिक नागरीकांना सहजरीत्या तक्रारी दाखल करणे शक्य होईल व जनमाणसांमध्ये अनधिकृत पार्किंगबाबत आपोआप जनजागृतीदेखील होऊ शकेल.

उपरोक्त सूचनांवर पोलीस महासंचालक कार्यालयाने तातडीने कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल शासनास उलटटपाली सादर करावा. तसेच, पोलीस घटक प्रमुख यांनी या सूचना आपल्या अधिपत्याखालील वाहतूक शाखेच्या निदर्शनास त्वरीत आणाव्यात व याची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी निरंतर होईल याकडे विशेष लक्ष द्यावे व वेळोवेळी आढावा घ्यावा.

सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३२६१५४७१४०५२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sudhakar D. Pawar

Digitally signed by Sudhakar D. Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c1ebd27661971090dc2c91d4bb9caabd4da394aa85829a09265097faf097ba5, cn=Sudhakar D. Pawar
Date: 2019.03.26 15:51:40 +05'30'

(सु. धों. पवार)
शासनाचे अवर सचिव

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
३) प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, मंत्रालय
४) प्रधान सचिव (परिवहन), मंत्रालय, मुंबई
५) आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कंपनी लि.
६) पोलीस आयुक्त (सर्व)
७) पोलीस आयुक्त (लोहमार्ग)
८) अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), म.रा., मुंबई

९) अपर पोलीस महासंचालक (लोहमार्ग), म.रा., मुंबई
१०) महानगरपालिका आयुक्त (सर्व)
११) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१२) सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई
१३) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उपमहानिरीक्षक
१४) पोलीस अधिक्षक (सर्व)
१५) पोलीस अधिक्षक (लोहमार्ग)

प्रत, माहितीकरीता -

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२) मा.राज्यमंत्री, गृह (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
३) निवड नस्ती (पोल-८).